बुधवार, दि १० डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक १४ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# थंडीची लाट ! प्रशासनाकडून खबरदारीच्या सुचना

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हयातील नागरीकांना कळविणेत येते की, प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिनांक ०९/१२/२०२५ रोजी दुपारी ११.५५ वा. दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात दिनांक १०/१२/२०२५ ते ११/१२/२०२५ रोजी यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हयातील तमाम नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

**थंडीची लाट काय करावे व काय करू नये**

१. आवश्यकता असल्यास घराबाहेर जावे अन्यथा घरीच थांबावे.
२. थंडीपासून संरक्षण करण्यासाठी उबदार कपडे आहेत याची खात्री करावी.
३. प्रसार माध्यमाव्दारे वेळोवेळी थंडीचा प्रतिकार करण्यासाठी दिलेली माहिती किंवा सूचना अमलात आण्याव्यात,
४. एकटे राहणाऱ्या वयोवृद्ध शेजारच्या व्यक्तीकडे लक्ष दयावे.
५. गरम राहणाऱ्या किंवा इमारतीमधील जास्त हवा न येणाऱ्या खोलीमध्ये वास्तव्य करावे. रूम हिटर चा वापर करावा. गरम पेय घ्यावे व शरीर उष्ण राहण्यासाठी व चंडीच्या लाटेचा प्रतिकार करण्यासाठी शरीराला तयार करावे.
६. विद्युत प्रवाह खंडीत झाल्यास फ्रीज मधील खाण्याचे पदार्थ ४८ तास व्यवस्थित राहू शकतात फक्त त्याचा दरवाजा व्यवस्थीत लागतो का ते पहावे व जास्त वेळा उघडू नये.
७. थंडी पासून बचाव करण्यासाठी टोपी किंवा मफलरचा वापर करावा.
८. रॉकेल च स्टोव्ह किंवा कोळश्याची शेगडी वापरत असाल तर त्याचा धूर जाण्यासाठी खिडकी उघडी असावी अन्यथा दुषित धुरामुळे बाधा होऊ शकते.
९. ताजे पदार्थ खावेत ज्यामुळे शरीरामध्ये उर्जा निर्माण होईल, मादक पदार्थ किंवा अल्कोहोल मिश्रित नसलेले पेय घ्यावेत.
१०. हिमबाधा झाल्याचे लक्षणे दिसताच डॉक्टरांना भेटावे. स्पर्श केल्यानंतर जाणीव होत नसल्यास किंवा हाताची बोटे, कानाची पाळी, नाकाचा शेंडा यांचा रंग पांढरा किंवा फिक्कट झाल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

खालील लक्षणे आढळल्यास तात्काळ डॉक्टरांना दाखवावे
१. शरीर थंड पडणे II. थंडी वाजणे, III. स्मृतीभ्रंश होणे. IV. बोलतांना विसंगती किंवा अडखळणे, उच्चार स्पष्ट न करता येणे, V. अंधारी येणे, थकवा जाणवणे.



# जालना जिल्हा पोलीस दलासाठी तिन मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध

जालना जिल्हा पोलीस दलात एकुण १९ पोलीस ठाणे कार्यारत असुन पोलीस ठाणे हद्दीत खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, दरोडयाचा प्रयत्न, दुखापत, जबरी दुखापत, फुस लावुन पळुन नेणे, बलात्कार, आत्महत्यास प्रवृत करणे, जबरी चोरी, चोरी, घरफोडी, पोस्को, हुंडा बळी, अंमली पदार्थ विरोधी कार्यावाही असे गुन्हे घडत असतात. पोलीस दलाकडुन आरोपी विरुध्द घटनास्थळावरील पुरावे गोळा केले जात होते, परंतु पुरावे गोळा करतांना पोलीसांना अडचणी निर्माण होत होत्या.
आता महाराष्ट्र शासनाने जालना जिल्हा पोलस दलासाठी अत्याधुनिक तिन मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स उपलब्ध करुन दिल्या असुन जिल्हयात २४*७ उप विभागीय अधिकारी कार्यालय येथे उपलब्ध राहणार आहे. सदर मोबाईन फॉरेन्सिक व्हॅनमध्ये भौतीक, रासायनिक, जैविक व पान २ वर




जालना ड्रायपोर्ट दिरंगाई

## हिवाळी अधिवेशनात आवाज उठवा, अन्यथा राजीनामे द्या - ॲड. धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** येथील बहुप्रतिक्षित मल्टीमोडल लॉजिस्टिक पार्क (ड्रायपोर्ट) प्रकल्पाला होत असलेल्या अक्षम्य दिरंगाईवर नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश धनावत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. काही काळापूर्वी या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया सुरू झाल्याच्या बातम्यांमुळे जनतेमध्ये आशेचे किरण निर्माण झाले होते, मात्र प्रत्यक्षात प्रकल्पाचे काम रखडले आहे. ही केवळ जालनावासीयांची फसवणूक नसून, तरुणांच्या मानवाधिकारांचे उल्लंघन आणि देशाच्या पंतप्रधानांचा अपमान आहे, असे खळबळजनक विधान ॲड. धन्नावत यांनी केले आहे. या संदर्भात प्रसिद्धीपत्रक जारी करताना ॲड. धन्नावत म्हणाले, ज्या प्रकल्पाचे उद्घाटन स्वतः भारताचे पंतप्रधान करतात, तो प्रकल्प अनेक वर्षे रखडणे ही अत्यंत गंभीर आणि लाजिरवाणी बाब पान २ वर

# अनाधिकृत नळ शोध मोहिमेंतर्गत लोक अदालतीचे आयोजन

## लोकअदालतीमध्ये अनाधिकृत नळ धारकांनी रु. १०,०००/- ऐवजी रु. ७५००/- शुल्क भरणा करावा - आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील अनाधिकृत नळ धारकांचे सर्वेक्षणाचे काम महानगरपालिकेच्या वतीने नियुक्त साई एजन्सी, जालना मार्फत पुर्ण केले आहे. नळ कनेक्शन धारकाच्या सर्वेक्षण अर्जांची कर विभागाच्या अभिलेखाशी पडताळणी करुन त्यामध्ये अनाधिकृत असलेल्या नळ धारकांना रु. १०,०००/- भरणा करुन नळ कनेक्शन नियमित करण्याच्या सुचना देण्यात आलेली आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक, जालना मनपा यांच्या प्रशासकीय ठरावानुसार अनाधिकृत नळ कनेक्शन नियमित करणे करिता अनाधिकृत नळ धारकांकडुन दिनांक २१/११/२०२५ ते दिनांक २०/१२/२०२५ रोजीपर्यंत रु. १०,०००/- ऐवजी रु. ७५००/- शुल्क भरुन घेणे करिता सवलत देण्यात आली आहे. करिता दिनांक २१/११/२०२५ ते दिनांक ०९/१२/२०२५ रोजीपर्यंत एकुण ४४१ अनाधिकृत नळ धारकांनी सवलतीचा लाभ घेतला आहे.

मा. विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, जालनाच्या वतीने दिनांक १३/१२/२०२५ रोजी लोक अदालतचे आयोजन केले असून यामध्ये अनाधिकृत नळ कनेक्शन धारकांना देण्यात आलेल्या नोटीस संदर्भात प्रकरणे तडजोड करण्यात येणार आहे. यामध्ये अनाधिकृत नळ कनेक्शन धारकांकडुन तडजोडीपोटी रु. १०,०००/- ऐवजी रु. ७५००/- शुल्क भरुन घेणे करिता सवलत देण्यात आली आहे. जालना शहरातील नागरिकांनी सदरील सवलतीचा लाभ घ्यावा.

जे नागरिक अनाधिकृत नळ कनेक्शन असल्याबाबत शुल्क रक्कम भरणार नाहीत, त्यांच्या मालमत्तेवर रु. १०,००० चा बोजा टाकण्यात येईल व तदनंतर अनाधिकृत नळ धारकांचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात येवुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

# प्रत्येक कुटुंबाची माहिती मोबाईल ॲपवर नोंदवून जनगणना केली जाईल -जिल्हाधिकारी मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** जनगणना-२०२७ हा खुप महत्वाचा विषय आहे. भारताच्या इतिहासातील प्रचंड मोठा बदल आहे. जातीनिहाय जनगणना केली जाणार आहे. जनगणना ही एकाच टप्प्यात पार पडणार आहे. कोणतेही घर अथवा कुटुंब या जनगणनेतून सुटता कामा नये, जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषदेसह पालिकेतील अधिकाऱ्यांना मास्टर ट्रेनर्स म्हणून तयार करण्यात येणार आहे. ५ जानेवारीपर्यंत हाऊस लिस्टींग ब्लॉक तयार करावयाचा आहे. तसेच स्वत:च्या मोबाईलद्वारे प्रगणकाला प्रत्येक कुटुंबाची अचुक माहिती ही पवर नोंदवून जनगणना केली जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली. भारताची जनगणना- २०२७ साठी प्राथमिक बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत




हदगल, तहसीलदार अनिल नव्हाते यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी प्रत्यक्ष तर सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व मुख्याधिकारी हे दुरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्ह्यातील जनगणना ही पुढील वर्षात केली जाणार आहे. यामध्ये ५ जानेवारी २०२६ पर्यंत हाऊस लिस्टींग ब्लॉक तयार करणे. दि.२० जानेवारीपर्यंत प्रगणकाची यादी तयार करण्यात येईल. १० जानेवारीपर्यंत मास्टर ट्रेनर्सची निश्चिती होईल. आणि दि.३१ जानेवारीपर्यंत फिल्ड ट्रेनर्स निश्चित केले जातील. अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिली. प्रत्येक टप्प्यावर तहसीलदार आणि मुख्याधिकारी यांनी पडताळणी करुन खात्री झाल्यानंतरच आपली स्वाक्षरी प्रपत्रावर करावी. जिल्हास्तरावरही मास्टर्स ट्रेनर्स निवडून यामध्ये ट्रेनिंग मुद्देसुद्द दिली जाणार आहे. डिजीटल जनगणना केली जाणार असून मे आणि जुनमध्ये हाऊस आयडेंटीफाय करुन त्यांना क्रमांक दिला जाणार आहे. जनगणनेसाठी तालुकास्तरावर कार्यक्षम व तंत्रस्नेही १० अधिकारी-कर्मचारी घेवून जनगणना २०२७ कक्ष स्थापन करावा जेणेकरुन भविष्यात समन्वय साधण्यास अडचण निर्माण होणार नाही. सहा प्रगणकामागे एक पर्यवेक्षकाची नेमणूक करावी लागणार आहे. असे निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी यावेळी बैठकीत सांगितले.

## संपादकीय

# असंघटित कामगारांचा आधारवड हरपला

असंघटित कामगारांच्या हक्कांसाठी झटणारे ज्येष्ठ कामगार नेते, पुरोगामी चळवळीचे आधारवड, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ बाबा आढाव यांचे सोमवारी ( दिनांक ८ डिसेंबर ) रोजी वृद्धापकाळाने वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने कष्टकरी, श्रमजीवी वर्गासाठी आयुष्य वेचणारे नेतृत्व हरपले. त्यांच्या निधनाने या वर्गाचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे मोठे नुकसान झाले आहे. डॉ बाबा आढाव यांनी कष्टकरी, श्रम जीवी वर्गासाठी जितके कार्य केले तितके कार्य याआधी कोणीही केले नाही. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा वारसा सांगणाऱ्या बाबा आढाव यांचा जन्म १ जून १९३० रोजी पुण्यात झाला. ते नाना पेठेतील नामांकित आयुर्वेदिक डॉक्टर होते. बाबा आढाव यांनी वयाच्या २३ व्या वर्षीच म्हणजे १९५३ सालीच सामाजिक चळवळीत भाग घ्यायला सुरुवात केली. त्यावेळेच्या तरुणांना समाजवादी विचारांची भुरळ पडली होती तशी भुरळ बाबा आढाव यांनाही पडली म्हणूनच त्यांनी समाजवादी पक्षात प्रवेश करून सामाजिक कार्यास सुरुवात केली. १९७० सालापर्यंत बाबा आढाव समाजवादी पक्षाबरोबर राहिले या काळात त्यांनी अनेक आंदोलन केले. ते पुण्याचे नगरसेवकही होते. नाना पेठ हा शहरातील बाजार पेठेचा भाग असल्याने अनेक व्यवसायातील कामगार, हमाल तिथे येत असत त्यामुळे कामगारांना येणाऱ्या अडचणी बाबा आढावा यांच्या लक्षात येऊ लागल्या हमालांचे शोषण होऊनही त्यांना कुठलेही कायदेशीर संरक्षण नसल्याचे त्यांनी पाहिले. या गोष्टीचा त्यांच्या म नावर खोल परिणाम झाला. अखेर १९६६ साली त्यांनी आपला चांगला चाललेला डॉक्टरकीचा व्यवसाय सोडला आणि कामगारांच्या पाठीशी उभे राहण्याचे ठरवले. १९७० नंतर मात्र बाबा आढाव यांनी राजकारणातून फारकत घेऊन कष्टकरी श्रमजीवी वर्गासाठी अर्थात असंघटित वर्गासाठी काम करण्याचे ठरवले. या वर्गाला त्यांचे अधिकार आणि हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली. नडलेल्या, नाकारलेल्या उपेक्षित घटकांपर्यंत स्वातंत्र्याचे नि सार्वभौम लाभ पोहचवण्याचे काम त्यांनी केले. हमालपंचायत, , रिक्षा पंचायत, मोलकरीण पंचायत, कागद - पत्रा - काच वेचक कष्टकरी पंचायत, पथारी व्यावसायिक पंचायत, टेम्पो पंचायत अशा अनेक असंघटित कामगाराच्या संघटना त्यांनी बांधल्या. या संघटनांच्या माध्यम ातून त्यांनी असंघटित कामगारांना न्याय, सन्म ान आणि सामाजिक सुरक्षा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. हमाल पंचायतची स्थापना ही त्यांच्या कार्याचा महत्वाचा टप्पा ठरली. हमाल पंचायतीच्या माध्यमातून बाबा आढाव यांनी पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील हमालांना संघटित केले. जातीय भेदभावा विरुद्ध लढण्यासाठी त्यांनी एक गाव एक पाणवठा या क्रांतिकारी चळवळीचे नेतृत्व केले आणि समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न त्यांनी आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत सुरू ठेवला. महाराष्ट्रातल्या सामाजिक चळवळीत जवळपास पाच दशकांहून अधिक काळ बाबा आढाव यांचा सहभाग राहिला. बाबा आढावांच्या नेतृत्वाचे सर्वात मोठे महत्वाचे वैशिष्टे म्हणजे त्यांना असणारे राजकीय व्यवहार्यतेचे भान. असंघटित कामगारांचे संघटन करताना शोषणाच्या कमी अधिक प्रमाणात लढत राहणे, असंघटितांसाठी लढताना शासनाशी आर्थिक मागण्या न करता स्वायत्तपणे सहकारी संस्थांमधून सामाजिक सुरक्षितता मिळवण्याचे प्रयत्न करणे आणि सामाजिक प्रबोधन घडवणे. संशोधन संस्थांचे सहाय्य घेऊनही संघर्षात्मक राजकारणाचे प्राधान्य कायम ठेवणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे पक्षीय राजकारणात सहभागी न होता देखील कळीच्या मुद्यावर राजकीय भूमिका घेण्याचे धाडस दाखवणे अशा सर्व पातळ्यांवर बाबा आढावांमध्ये व्यवहार्यतेचे भान स्पष्ट होत जाते. संघर्ष आणि प्रबोधन अशा दुहेरी मार्गांनी झालेली त्यांच्या नेतृत्वाची वाटचाल पुरोगामी राजकारणाचा एक महत्वाचा दस्तऐवज आहे. बाबा आढाव यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतील अढळ तारा निखळला. त्यांच्या निधनाने असंघटित कामगारांचा आधारवड हरपला. बाबा आढाव यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

पान १ वरुन

## जालना जिल्हा ...

डिजीटल पुरावे गोळा करण्याकरीता किट्स, रसायने व साध सामुग्री उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स हया जिल्हयातील घडणाऱ्या सर्व घटनास्थळी विनाविलंब भेट देऊन आरोपी विरुध्द भौतीक, रासायनिक, जैविक व डिजीटल पुरावे गोळा केल्याने आरोपीस मा. न्यायालयात शिक्षा होण्यास मदत होणार आहे.

तसेच जालना जिल्हा पोलीस दलातील उप विभाग जालना, भोकरदन व परतुर या ०३ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स मिळालेल्या आहे. सर्व मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स हया उप विभागा प्रमाणे कार्यरत असणार असुन त्यावर उप विभागीय पोलीस अधिकारी हे देखरेख ठेवणार आहे

## हिवाळी अधिवेशन ...

आहे. ही प्रशासकीय दिरंगाई नसून पंतप्रधानांच्या दूरदृष्टीचा आणि त्यांच्या शब्दाचा केलेला अपमान आहे. एकप्रकारे ही पंतप्रधानांची स्पष्ट बदनामी आहे. या दिरंगाईमुळे जालना आणि मराठवाड्यातील औद्योगिक विकासाला खीळ बसली आहे.

**तरुणांच्या मानवाधिकारांचे उल्लंघन**

ॲड. धनावत यांनी या दिरंगाईचा थेट संबंध तरुणांच्या भवितव्याशी जोडला. ते म्हणाले, ड्रायपोर्टमुळे हजारो तरुणांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळणार होता. मात्र, प्रकल्पाच्या दिरंगाईमुळे तरुणांच्या रोजगाराच्या हक्कावर गदा येत आहे. त्यांना विकासाच्या संधींपासून वंचित ठेवले जात आहे, जे त्यांच्या मानवाधिकारांचे स्पष्ट उल्लंघन आहे. सरकार आणि स्थानिक लोकप्रतिनिधी या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करत आहेत.

**आमदारांना थेट आव्हान**

येत्या महाराष्ट्र विधानसभा हिवाळी अधिवेशनाकडे लक्ष वेधत ड. धनावत यांनी जिल्ह्यातील आणि शेजारील जिल्ह्यांतील आमदारांना थेट आव्हान दिले आहे. जनतेने तुम्हाला त्यांचे प्रश्न विधानसभेत मांडण्यासाठी निवडून दिले आहे. जालना ड्रायपोर्टचा मुद्दा हा केवळ एका शहराचा नसून संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाचा आहे. त्यामुळे, सर्वपक्षीय आमदारांनी हा प्रश्न हिवाळी अधिवेशनात तातडीने आणि आक्रमकपणे मांडावा. सरकारला यावर जाब विचारावा आणि प्रकल्पासाठी ठोस कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्यास भाग पाडावे.

जर सरकारकडून यावर समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही किंवा या प्रश्नावर आवाज उठवण्यात आमदार कमी पडले, तर त्यांनी जनतेच्या हक्कांसाठी आपल्या पदाचे राजीनामे देण्याची नैतिक तयारी ठेवावी. जनतेच्या प्रश्नावर आवाज उठवू शकत नसाल, तर पदावर राहण्याचा तुम्हाला कोणताही अधिकार नाही, असा सज्जड इशाराही त्यांनी दिला.

या प्रकरणी नोटरी असोसिएशन आणि इतर सामाजिक संघटना लवकरच पुढील संघर्षाची दिशा ठरवणार असल्याचेही ड. धनावत यांनी स्पष्ट केले.

# जिल्ह्यातील पशुपालकांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात विदर्भ मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ अंतर्गत पशुपालकांसाठी विविध योजना महाराष्ट्र शासनाने विदर्भ व मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांमध्ये सन २०२४-२५ ते २०२७-२८ या कालावधीमध्ये दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पामध्ये जालना जिल्ह्याचा समावेश असून ग्रामीण भागातील पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. ५० टक्के अनुदानावर उच्च दुधउत्पादन क्षमता असलेल्या १ दुधाळ गाय/म्हशीचे वाटप. ७५ टक्के अनुदानावर उच्च दुधउत्पादन क्षमता असलेल्या १ भृनाचे प्रत्यारोपण केलेली सात महिन्याची गाभण कालवड वाटप. २५ टक्के अनुदानावर प्रजनन पूरक खाद्य पुरवठा. २५ टक्के अनुदानावर फट व एसएनएफ वर्धक खाद्य पुरवठा. ५० टक्के अनुदानावर कडबाकुट्टी यंत्र वाटप. २५ टक्के अनुदानावर मुरघास पुरवठा. १०० टक्के अनुदानावर सावर बहुवार्षिक चारा पिके घेण्यासाठी बियाणे/ठोंबे वाटप. तरी या योजनांचा लाभ घेण्याकरीता जास्तीत जास्त पशुपालकांनी www.vmddp.com या संकेतस्थळावर भेट देऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जालना यांनी केले आहे. तसेच योजनांसंबंधी अधिक माहितीकरीता विदर्भ मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ चे जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. विशाल जाधव जालना यांना ८६०५४५१८५० या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. असेही कळविले आहे.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# मंठा तालुक्यामधील बरबडा- आकणी बृहद लघुपाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ५०० कोटी रुपये निधी द्या

## आमदार बबनराव लोणीकर यांची विधानसभेत मागणी

**नागपूर । प्रतिनिधी** - परतुर विधानसभा मतदारसंघाच्या मंठा तालुक्यातील बरबडा आकणी बृहद लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम ९० टक्क्याच्या वर पूर्ण झाले असून केवळ कंदर भरणी करण्याचे काम बाकी आहे. शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीचा व घरांचा मावेजा देखील देणे अद्याप बाकी आहे. ३० वर्षापासून धरणाचे काम अपूर्ण असून आकणी गावाचे पुनर्वसन करणे देखील अद्याप बाकी आहे. या बृहद लघु पाटबंधारे विभागाच्या प्रकल्पास निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या संदर्भात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने मा. मुख्यमंत्री यांनी छत्रपती संभाजीनगर येथे निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात घोषणा देखील केलेली आहे. परंतु अद्याप पर्यंत निधी प्राप्त झालेला नाही त्यासाठी आवश्यक असणाऱ्या ५०० कोटी रुपयांच्या निधीची सुधारित प्रशासकीय मान्यता तात्काळ देण्यात यावी असे आग्रही मागणी माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्यांदा २०१४ मध्ये मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर अगोदर पुनर्वसन मग धरण असे धोरण अवलंबण्यात आले होते परंतु ज्या वेळेला आकणी बरबडा हा प्रकल्प मंजूर करण्यात आला त्यावेळेला हे धोरण नव्हते. या धरण संदर्भात गोदावरी खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक मुख्य अभियंता अधीक्षक अभियंता कार्यकारी अभियंता यांच्या चुकीमुळे ८० टक्के काम पूर्ण झाले शेतकऱ्यांच्या जमिनी पडीक पडल्या परंतु आकनी या गावाचे पुनर्वसन मात्र झाले नाही अगोदर जमीन संपादित करणे त्यानंतर जमिनीचा मावेजा देणे, वितरिकांसाठी जमीन संपादित करणे आणि वितरिकांचा मावेजा देणे असे अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र अधिकाऱ्यांनी धरण आणि वितरिका दोन्हीसाठी निधीची मागणी असताना केवळ वितरिकांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

पहिल्या टप्प्यात धरणासाठी जमीन संपादित करून धरण पूर्ण करणे त्यानंतर कंदरभरणी करणे व त्यानंतर वितरिकांसाठी जमीन संपादित करणे, विचारीकांसाठी संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा देणे असे अपेक्षित असताना प्रत्यक्षात अधिकाऱ्यांनी मात्र वितरिकांचा मावेजा दिला प्रत्यक्षात धरणाचा मावेजा मात्र अद्याप पर्यंत मिळालेला नाही या धरणाला आता ३० वर्ष पूर्ण होत असून हा प्रश्न अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे अद्याप प्रलंबित आहे या प्रकरणी गोदावरी खोरे विकास महामंडळाकडून २ वेळा सुधारित प्रशासकीय मान्यतेचा अहवाल मागविण्यात आला मा.जलसंपदा मंत्री श्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी देखील १ वेळा हा अहवाल मागवला होता परंतु काही तांत्रिक बाबींमुळे या प्रकल्पाची सुधारित प्रशासकीय मान्यता होऊ शकली नाही. ती प्रशासकीय मान्यता तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी व आकणी गावाच्या पुनर्वसनासह शेतकऱ्यांच्या जमिनीचा मावेजा या संदर्भाने सुधारित प्रशासकीय मान्यता तात्काळ देण्यात यावी अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

परतूर तालुक्यातील आंबा व मंठा तालुक्यातील वाघाळा-टाकळखोपा तळणी, देवठाणा-उस्वद येथील कोल्हापुरी बंधारे फुटलेले आहेत. संबंधित बंधारे फुटल्याने नदीपात्रातील पाणी वाहून जात आहे. बाजूची जमीन खरडली जात आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. त्यामुळे या फुटलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याचे रूपांतर उच्च पातळी बंधाऱ्यात करणे आवश्यक असल्याची वारंवार मागणी केली जात आहे. यासंदर्भात वारंवार सभागृहात लक्षवेधी, तारांकित प्रश्न, औचित्याच्या मुद्द्याद्वारे तसेच प्रत्यक्ष पत्राद्वारे व प्रत्यक्ष भेटून देखील मागणी करण्यात आली आहे. या संदर्भाने तात्काळ प्रशासकीय मान्यता देऊन या फुटलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्यांचे उच्च पातळ बंधाऱ्यात रूपांतर करण्यात यावी अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत केली.

यासंदर्भात पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की या सर्व



बंधाऱ्यांच्या माध्यमातून सिंचन वाढले जाणार असून शेतीला व पिण्याचा पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सुटणार आहे. या उच्च पातळी बंधाऱ्यांना यापूर्वी २ वेळा प्रशासकीय मान्यता मिळाली होती, परतुर तालुक्यातील आंबा येथील उच्च पातळी बंधाऱ्याचा कार्यारंभ आदेश देखील निघाला होता परंतु तत्कालीन परिस्थितीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात पडलेला पाऊस, झालेली अतिवृष्टी यामुळे प्रशासकीय मान्यता झालेले हे बंधारे अधिकच फुटले. मंजूर असलेल्या रकमेमध्ये या बंधाऱ्याचे काम पूर्ण होऊ शकत नव्हते, यासाठी मंजूर प्रशासकीय मान्यतेपेक्षा दुप्पट खर्च लागणार होता म्हणून तत्कालीन कंत्राटदाराने हे काम केले नाही. आजच्या परिस्थितीमध्ये हे कोल्हापुरी बंधारे दुरुस्त करण्याच्या परिस्थितीमध्ये नाहीत त्यामुळे या ठिकाणी उच्च पातळी बंधारे करून परिसरातील नागरिकांच्या सिंचन-शेतीसाठी पाणी आणि पिण्याच्या पाण्याचा गंभीर बनत चाललेला प्रश्न सोडवावा अशी आग्रही मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत केली.

## दिल्लीतील भारत मंडपम् येथे भव्य 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे आयोजन !

# दुर्मिळ शिवकालीन शस्त्रप्रदर्शन संरक्षणतज्ञांद्वारे देशाच्या सुरक्षेवर चर्चा !

**नवी दिल्ली । प्रतिनिधी** - 'ऑपरेशन सिंदूर'सारख्या धाडसी मोहिमांपासून ते चौथ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता बनण्यापर्यंतचा प्रवास भारताने केला आहे; मात्र अलीकडेच दिल्लीतील बॉम्बस्फोट, तसेच देशांतर्गत लहान-लहान व्हाईट कॉलर दहशतवादी गट कार्यरत करून हल्ल्याची योजना आखली जात असल्याचे समोर आले आहे. यातून देशाच्या अंतर्गत सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दुसरीकडे देशविरोधी विदेशी शक्ती, डीप-स्टेट, नक्षलवाद, विघटनवादी, घुसखोरी, नॅरेटीव्ह युद्ध, लव्ह जिहाद, हलाल जिहाद आदी विविध माध्यमांतून भारताला खिळखिळे करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा वेळी दिखाऊ धर्मनिरपेक्षतेची नव्हे, तर भारतभूमीमध्ये पुन्हा एकदा प्रभु श्रीराम, श्रीकृष्ण, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या क्षात्रतेजाची नितांत आवश्यकता आहे. देशात पुन्हा सुरक्षा, संस्कृती आणि शौर्य यांचे जागरण होण्यासाठी भारताने विश्वकल्याणकारी 'सनातन राष्ट्र' म्हणून उभे राहणे अत्यावश्यक आहे. हाच संदेश देशभर पोहोचवण्यासाठी 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन' प्रस्तुत आणि 'सनातन संस्था' आयोजित भव्य 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' १३ व १४ डिसेंबर २०२५ या दिवशी नवी दिल्ली (इंद्रप्रस्थ) येथील 'भारत मंडपम्'मध्ये होणार असल्याची माहिती सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिली.

दिल्लीतील प्रेस क्लब ऑफ इंडिया येथे आयोजित पत्रकार परिदेषेत 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत'चे अध्यक्ष व भारताचे माजी माहिती आयुक्त श्री. उदय माहूरकर, हिंदु जनजागृति समितिचे मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे, सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ती श्री. चेतन राजहंस, तसेच सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता अमिता सचदेवा हे उपस्थित होते.

सनातन संस्थेचे श्री. अभय वर्तक पुढे म्हणाले की, सनातन संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्ष, तसेच रामराज्यासम 'सनातन राष्ट्र' स्थापनेसाठी कार्यरत असलेले सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या जन्मोत्सवानिमित्त गोव्यात पहिला 'शंखनाद महोत्सव' झाला. त्याला २३ देशांतील ३० हजारांहून अधिक भाविकांचे अभूतपूर्व उपस्थिती, अनेक साधुसंत, गोव्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्र्यांची उपस्थिती लाभली व महोत्सव यशस्वीरित्या पार पडला. त्यानंतर आता दिल्लीत होणारा हा महोत्सव राष्ट्र आणि संस्कृती यांच्या रक्षणाचा शंखनाद करणारा असेल.

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी रामराज्यासमान आदर्श 'सनातन राष्ट्र' स्थापन करण्याचा पवित्र संकल्प केला आहे. महाभारत युद्धापूर्वी भगवान श्रीकृष्णांनी जसे धर्मयुद्धाचा शंखनाद केला, त्याचप्रमाणे हा महोत्सव धर्मनिष्ठ समाजातील आत्मशक्ती जागृत करून धर्मसेवा, राष्ट्रसेवेची प्रेरणा देणारा शंखनाद आहे. दोन दिवसीय महोत्सवात 'सनातन संस्कृती संवाद', सांस्कृतिक-सामाजिक घडामोडी, राष्ट्रीय सुरक्षा, दहशतवाद-नक्षलवादाची पार्श्वभूमी, संरक्षणनीती आणि राष्ट्रबळ दृढ करण्याचे उपाय या महत्त्वाच्या विषयांवर विविध क्षेत्रांतील




तज्ज्ञ उद्बोधन करतील. दुसऱ्या दिवशी 'विश्वकल्याणकारी सनातन राष्ट्र' या विषयावर विशेष सत्र आयोजित करण्यात आले आहे.

**दुर्मिळ शिवकालीन शस्त्रप्रदर्शन :** दिल्लीतील भव्य अशा भारत मंडपम्मधील एक्झिबिशन हॉल क्रमांक '१२' मध्येही १३ ते १५ डिसेंबर २०२५ या तीन दिवसीय कालावधीत वैशिष्ट्यपूर्ण अशा 'शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन', तसेच 'सनातन संस्कृती', 'राष्ट्र, कला, आध्यात्मिक वस्तू' यांचे भव्य प्रदर्शनही लावण्यात येणार आहे. या प्रदर्शनीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील सुमारे २५० हून अधिक दुर्मिळ आणि ऐतिहासिक शस्त्रे दिल्लीमध्ये प्रदर्शित होत आहेत. हे प्रदर्शन सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत पाहता येईल. पारंपरिक आणि प्राचीन युद्धकलांचे रोमांचकारी प्रात्यक्षिकेही या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण असेल. या महोत्सवात अनेक संत-महंत, मान्यवर, विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती असणार आहे. त्यात श्रीराम जन्मभूमी न्यास कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेवगिरी महाराज, केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक मंत्री श्री. गजेंद्रसिंह शेखावत, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री श्री. संजय शेठ, केंद्रीय उर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक, दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री कपिल मिश्रा, छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, भारताचे माजी सरन्यायाधीश श्री. उदय लळित, संरक्षण तज्ञ श्री. संजय अग्रवाल, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य श्री. प्रियांक कानुनगो, 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत'चे अध्यक्ष व भारताचे माजी माहिती आयुक्त श्री. उदय माहूरकर, मेहंदीपुर बालाजी मंदिराचे प.पू. डॉ. नरेशपुरीजी महाराज, तसेच सनातन संस्थेच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ उपस्थित राहून मार्गदर्शन करतील. तसेच काशी-मथुरा मुक्तीसाठी लढणारे अधिवक्ता विष्णू शंकर जैन, सुदर्शन न्यूजचे प्रधान संपादक श्री. सुरेश चव्हाणके यांची उपस्थित असणार आहे. संतांचे आध्यात्मिक बळ आणि या मान्यवरांचे सामाजिक अन् राष्ट्रीय कार्य, यांचा त्रिवेणी संगम म्हणजे हा महोत्सव असेल. या महोत्सवाची माहिती जाणून घेण्यासाठी, तसेच सहभागी होण्यासाठी SanatanRashtraShankhnad.in या संकेतस्थळावर जाऊन नाव नोंदणी करावी, तसेच कार्यक्रमस्थळी येतांना सोबत शासकीय ओळखपत्र आणावे, असे आवाहनही सनातन संस्थेकडून करण्यात आले.

## जिल्ह्यातील पशुपालकांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यात विदर्भ मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ अंतर्गत पशुपालकांसाठी विविध योजना महाराष्ट्र शासनाने विदर्भ व मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांमध्ये सन २०२४-२५ ते २०२७-२८ या कालावधीमध्ये दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पामध्ये जालना जिल्ह्याचा समावेश असून ग्रामीण भागातील पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. ५० टक्के अनुदानावर उच्च दुधउत्पादन क्षमता असलेल्या १ दुधाळ गाय/म्हशीचे वाटप. ७५ टक्के अनुदानावर उच्च दुधउत्पादन क्षमता असलेल्या १ भृनाचे प्रत्यारोपण केलेली सात महिन्याची गाभण कालवड वाटप. २५ टक्के अनुदानावर प्रजनन पूरक खाद्य पुरवठा. २५ टक्के अनुदानावर फट व एसएनएफ वर्धक खाद्य पुरवठा. ५० टक्के अनुदानावर कडबाकुट्टी यंत्र वाटप. २५ टक्के अनुदानावर मुरघास पुरवठा. १०० टक्के अनुदानावर सावर बहुवार्षिक चारा पिके घेण्यासाठी बियाणे/ठोंबे वाटप. तरी या योजनांचा लाभ घेण्याकरीता जास्तीत जास्त पशुपालकांनी ीवि. ले या संकेतस्थळावर भेट देऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जालना यांनी केले आहे. तसेच योजनांसंबंधी अधिक माहितीकरीता विदर्भ मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ चे जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. विशाल जाधव जालना यांना ८६०५४५१८५० या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. असेही कळविले आहे.

### हिवाळी अधिवेशनात आमदार बबनराव लोणीकर यांचा दिव्यांगांच्या हक्कांसाठी जोरदार आवाज

# बनावट दिव्यांगत्व प्रमाणपत्रे तयार करून नोकऱ्या मिळवणाऱ्या अन् बनावट प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करा

## आमदार बबनराव लोणीकर यांचे विधानसभेत मागणी

**नागपूर । प्रतिनिधी -** नागपूर येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात आज आमदार बबनराव लोणीकर यांनी दिव्यांगांच्या समस्या आणि त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासंदर्भात प्रभावी व ठोस भूमिका मांडली. दिव्यांग नागरिकांसाठीच्या प्रमाणपत्र प्रक्रियेत वाढत चाललेली मनमानी, भ्रष्टाचार आणि विलंब या गंभीर मुद्द्यांकडे त्यांनी सरकारचे विशेष लक्ष वेधले.

राज्यात विविध शासकीय तसेच निमशासकीय विभागांमध्ये काही व्यक्तींनी बनावट दिव्यांगत्व प्रमाणपत्रे तयार करून नोकऱ्या मिळवल्याची अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत अशा प्रकारच्या गैरप्रकारामुळे पात्र दिव्यांग उमेदवारांना अन्याय होत असल्याचे निदर्शनास आले आहे. मागील ५ वर्षांत राज्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये बनावट दिव्यांगत्व प्रमाणपत्रांच्या आधारे नोकरी मिळवण्याची प्रकरणे नोंदवली गेली आहेत. अशा प्रकरणांमध्ये संबंधित व्यक्तींवर शिस्तभंग, गुन्हा नोंदणी किंवा नोकरीतून बडतर्फ करण्यासंदर्भात शासनाने कुठलीही कारवाई केलेली नाही ही बाब अत्यंत गंभीर असून बनावट दिव्यांगत्व प्रमाणपत्र मिळवणारे आणि बनावट दिव्यांगत्व प्रमाणपत्र देणारे अधिकारी यांच्यावर तात्काळ फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत केली.

**बनावट प्रमाणपत्रांवर आळा घालण्यासाठी ऑनलाइन डिजिटल पडताळणी प्रणाली (इ- व्हेरिफिकेशन सिस्टीम) सुरू करणे आवश्यक**

दिव्यांगत्व प्रमाणपत्रे बनावट असल्याचे तपासण्यासाठी शासनाने अधिकृत वैद्यकीय पडताळणी यंत्रणा किंवा समित्या कार्यरत करून बोगस प्रमाणपत्र देणारे रॅकेट उध्वस्त करण्यासंदर्भात कुठलीही ठोस कार्यवाही शासनाने अद्याप पर्यंत केलेली नाही. अशा बनावट प्रमाणपत्रांवर आळा घालण्यासाठी ऑनलाइन डिजिटल पडताळणी प्रणाली (इ- व्हेरिफिकेशन सिस्टीम) सुरू करणे आवश्यक आहे. पात्र व खऱ्या दिव्यांग उमेदवारांना अन्याय होऊ नये म्हणून शासनाने संरक्षणात्मक धोरण किंवा सुधारात्मक पावले उचलणे अपेक्षित होते परंतु असे करण्यात आले नाही. पडताळणी अंती दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र बनावट असल्याचे आढळून आल्यास विना विलंब नोकरीतून बडतर्फ करत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात यावा. बनावट दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय व निमशासकीय स्तरावर विभागनिहाय किती बनावट लाभार्थ्यांनी नोकरी मिळवली आहे व त्यावर कोणती कारवाई करण्यात आली याचा सविस्तर खुलासा शासनाने करावा अशी मागणी देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

**प्रमाणित दिव्यांगत्वाचे अधिकृत प्रमाणपत्र मिळण्यास मोठ्या अडचणींचा सामना**

आमदार लोणीकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की राज्यातील अनेक दिव्यांग नागरिकांना प्रमाणित दिव्यांगत्वाचे अधिकृत प्रमाणपत्र मिळण्यास मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वैद्यकीय मंडळांकडून होणारा अनावश्यक उशीर, काही ठिकाणी होत असलेली बोगस प्रमाणपत्रांची देवाणघेवाण, तसेच अधिकाऱ्यांकडून होणारी निष्काळजी वागणूक यामुळे पात्र लाभार्थ्यांचे नुकसान होत आहे अशी भूमिका विधानसभेत मांडत दिव्यांग प्रमाणपत्र हे त्यांच्या सर्व सरकारी योजनांचे दार उघडणारे साधन आहे. तेच जर चुकीचे किंवा बोगस असेल, तर त्या व्यक्तीच्या संपूर्ण जगण्याची पायाभरणीच ढासळते, असे आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

**बोगस प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी**

बनावट दिव्यांग व प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय व निमशासकीय नोकरी मिळवल्या प्रकरणी करण्यात आलेल्या गैरव्यवहारात सहभागी अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्या विरुद्ध कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी लोणीकर यांनी सरकारकडे केली. दिव्यांगांच्या नावावर होत असलेला गैरवापर थांबवण्यासाठी प्रशासनाने निरीक्षण यंत्रणा अधिक सक्षम करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.



**दिव्यांग धोरणाच्या अंमलबजावणीवर लोणीकरांचे प्रश्नचिन्ह**

दिव्यांग धोरणाच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आमदार लोणीकर यांनी सरकारसमोर दिव्यांगांचे अनेक प्रश्न उपस्थित केले. यामध्ये राज्यातील दिव्यांग धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत आहे का? जिल्हा वैद्यकीय मंडळांकडून प्रमाणपत्र देण्यात होणारी विलंब शृंखला का थांबत नाही? शासकीय कार्यालयांमध्ये दिव्यांगांसाठी रॅम्प, लिफ्ट, व्हीलचेअर सुविधा, टॉयलेट, दिशादर्शक फलक यांची कमतरता का? दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, लेखनसहाय्यक, शैक्षणिक साधने देण्यात ढिलाई का? दिव्यांग नोकरी इच्छुकांसाठी रोजगार मेळावे, मार्गदर्शन केंद्रे आणि आरक्षण प्रक्रियेत आवश्यक ती गती का नाही? असा प्रश्नांचा भडीमार केला. या प्रत्येक मुद्द्याने सभागृहात गंभीर चर्चा रंगली.

**सरकारने तातडीने पावले उचलण्याची मागणी**

आपल्या भाषणाच्या शेवटी लोणीकर यांनी सरकारला स्पष्ट इशारा दिला की दिव्यांगांसारख्या अतिसंवेदनशील घटकांवर अन्याय होत असेल, तर तो सहन केला जाणार नाही. दिव्यांगांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. त्यांच्या निष्काळजीपणामुळे एखाद्या व्यक्तीचे आयुष्य उद्ध्वस्त होत असेल, तर ते अत्यंत गंभीर आहे. सरकारने तातडीने ठोस पावले उचलावीत अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

**सभागृहात पाठिंबा**

लोणीकर यांच्या या मांडणीला इतर अनेक आमदारांनीही पाठिंबा दर्शवला. दिव्यांग हक्कांच्या संरक्षणासाठी प्रभावी यंत्रणा उभी करण्याची वेळ आता आली असून, सरकारने या बाबतीत ठोस आराखडा जाहीर करावा, अशी मागणी सर्वत्र व्यक्त होत आहे.

# न्यू वंडर किड्स इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे




**परतूर प्रतिनिधी -** दिनांक ०७ डिसेंबर २०२५ रविवार रोजी न्यू वंडर किड्स इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चे स्नेहसंमेलन गजानन लान्स येथे मोठ्या उत्साहात पार पडले.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे साहेब यांनी व संस्था अध्यक्ष नारायण दादा सोळंके यांनी माता सरस्वती आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन केले.

यावेळी बोलतांना उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे म्हणाले कि, मुलांच्या अंगभूत कलागुणांना वाव मिळण्यासाठी प्रत्येक शाळेने या पद्धतीचे भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित केले पाहिजे, अशा कार्यक्रमातून मुलांच्या सर्वांगीण विकासाला गती मिळते. त्याच शिक्षकांनी व पालकांनी मुलांच्या मनात मैदानी खेळाबद्दल आवड निर्माण करून त्याचे महत्त्व त्यांना पटवून द्यावे जेणे करून त्यांचा शारिरिक विकास होईल. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रिन्सिपल गोविंद पाठक यांनी केले तर सूत्रसंचालन संतोष हरकळ व नववी व दहावीचे विद्यार्थ्यां संस्कार भुतेकर, शौर्य देशमुख, प्रांजल शेरे, कार्तिकी शेरे, संस्कृती खरात, संस्कृती झरेकर, जान्हवी जगताप यांनी केले

यावेळी संस्थाध्यक्ष नारायणदादा सोळंके, कार्याध्यक्ष गणेश सोळंके, उपाध्यक्ष रंगनाथ भुतेकर, सचिव छाया बागल, प्रमुख पाहुणे संतोष झरेकर, निवृत्ती बिडवे, ड प्रवीण चव्हाण, विष्णू ढवळे, मनोहर खालापुरे, सुरेश मोठे, बालासाहेब हरबक, सुभाष बागल, श्रीकांत बागल, वशिष्ठ सोळंके, प्रिन्सिपल गोविंद पाठक, वाईस प्रिन्सिपल पुजा मोरे, संतोषी कारके, महादेव कदम, दिनेश साठे, गोपीनाथ जगदाळे, रोहित जैस्वाल, ऐहतेशाम खान, अभिषेक आरसाड, सुलेमान सय्यद, किशोरी जोशी, दामिनी टाकणखार, राधिका चव्हाण, शारदा चव्हाण, मंगल वेडेकर, शालू पारखे, ज्योतिका जगताप, गीता पायघन, तसेच सेविका ज्योती निलेवाड, पार्वती गुंजमूर्ती आणि सुखदेव सस्ते उपस्थित होते.

# पारसी टेकडी पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करणार - जिल्हाधिकारी

## केशवसृष्टी इरकॉन घनवनचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते लोकार्पण



**जालना । प्रतिनिधी -** पारसी टेकडीला पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, या भागाचे सुशोभीकरण करून ते पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनविण्यात येईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

इरकॉन भोज कंपनीच्यावतीने पारसी टेकडी येथील घनवनात १००० वृक्षांची लागवड करण्यात आली असून त्याचे लोकार्पण मंगळवार दि. ९ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांच्या हस्ते झाले, याप्रसंगी व त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पी. एम. मिन्नू, अतिरिक्त पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, केशव सृष्टी मुंबई संस्थेचे विश्वस्त निलकंठण अय्यर, उद्योजक रमेशभाई पटेल, सुनिल रायठठ्ठा, शिवरतन मुंदडा, नितीन काबरा, गोविंद गोयल, राहूल अग्रवाल, डॉ. विठ्ठल पवार, डॉ. प्रकाश सिगेदार, सुरेश कुलकर्णी, हेमंत ठक्कर, यश पूरी, डॉ. आशुतोष सोनी, सचिन लोहीया, डॉ. रितेश अग्रवाल, चिराग तलरेजा, विष्णू पाटेकर यांच्यासह विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या की, पारसी टेकडी परिसरात नैसर्गिक सौंदर्य ऐतिहासिक महत्त्व असलेली ठिकाणे असल्याने येथे पर्यटनाच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. या ठिकाणाचा विकास झाल्यास रोजगार निर्मितीबरोबरच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे. परिसरात रस्ते, पिण्याचे पाणी, प्रकाशयोजना, बसण्याची व्यवस्था, पार्किंग, कचरा व्यवस्थापन, सुरक्षा तसेच माहिती फलकांची उभारणी यांसारख्या मूलभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. इरकॉन भोज कंपनीच्या वतीने पारसी टेकडी येथील घनवनात १००० वृक्षांचे संगोपन करण्याचे काम समस्त महाजन, कुंडलिका व सिना फाउंडेशन करणार आहे. केशवसृष्टी संस्थेने आतापर्यंत ६५ हजार वृक्ष पारसी टेकडीवर लावलेले असून ३.५ लाख वृक्ष संवर्धित होत आहेत. लोकसहभागातून पारसी टेकडीवर वृक्षारोपण वृक्षसंवर्धन कार्य सुरू असून विविध सामाजिक संस्था, उद्योग समूह सक्रियपणे येथे योगदान देत आहेत. केशवसृष्टी संस्थेचे निलकंठण अय्यर यांचे जालना शहरवासियांच्यावतीने आभार व्यक्त करत विशेष सत्कार करण्यात आला.